पुणे महानगरपालिका

महिला व बाल कल्याण समिती

तहकुब सभा परिपत्र क्र.१

महिला व बाल कल्याण समितीची तहकुब झालेली सभा ( बुधवार,दिनांक २५/७/२०१८ रोजी तहकुब झालेली सभा) बुधवार , दिनांक ८/८/२०१८ रोजी दुपारी ३=२० (तीन वाजून वीस मिनिटे ) वाजता म. ज्योतीबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

**सदर सभेत कार्यपत्रिका क्र.९ ,दि. ११/७/२०१८ वरील विषय क्र. ५१ ते ५४ चा विचार होईल .**

नगरसचिव

पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका

महिला व बाल कल्याण समिती

तहकुब सभा परिपत्र क्र.२

महिला व बाल कल्याण समितीची तहकुब झालेली सभा ( बुधवार,दिनांक २५/७/२०१८ रोजी तहकुब झालेली सभा ) बुधवार ,दिनांक ८/८/२०१८ रोजी दुपारी ३=२५ (तीन वाजून पंचवीस मिनिटे ) वाजता म. ज्योतीबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

**सदर सभेत कार्यपत्रिका क्र.१० ,दि. २५/७/२०१८ वरील विषय क्र. ५५ ते ५८ चा विचार होईल**

नगरसचिव

पुणे महानगरपालिका

**पुणे महानगरपालिका**

**महिला व बाल कल्याण समिती**

**कार्यपत्रिका क्र. ११**

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार,दिनांक ८/८/२०१८ रोजी दुपारी ३=३०(साडे तीन ) वाजता महात्मा ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**सन २०१४–१५ , सन २०१५–१६ व सन २०१६–१७ चे वृत्तात कायम करणे .**

**विषय क्र. ५९**

**मा.ॲड. अब्दुल गफुर अहंमद पठाण यांचे दि.३१.७.२०१८ चे पत्र**

प्रभाग क्र.२७ कोंढवा खुर्द मिठानगर मध्ये हजरत ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती रहे. ख्वाजा गरीब नवाज दवाखाना नव्याने सुरु करण्यात आलेला आहे. कोंढवा खुर्द परिसरातील अनेक डायलेसिसची आवश्यकता असलेले रुग्ण असून अनेक वेळा मदतीसाठी चौकशी करत असतात. यातील अनेक रुग्ण गरीब असल्यामुळे डायलेसिस सारखा उपचार करणे त्यांच्या कुवतीच्या बाहेरचे असते. त्यामुळे या रुग्णांवर विना उपचार राहावे लागते. अश्या रुग्णांसाठी डायलेसिस सुविधा सुरु केल्यांस रुग्णांना मदत होईल.

प्रभाग क्र.२७ कोंढवा खुर्द मिठानगर मध्ये हजरत ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती रहे. ख्वाजा गरीब नवाज दवाखाना नव्याने सुरु करण्यात यावी.

**विषय क्र. ६०**

गरीब वैद्यकीय सहाय योजने अंतर्गत पॅनलवरील प्रायव्हेट हॉस्पिटल्समधील अंर्तरुग्ण विभागातील वैद्यकीय उपचारांसाठी र.रु.१ लाखाची मर्यादा र.रु.२ लाखापर्यंत वाढविण्यात येवून योजने अंतर्गत सभासदत्व मिळणेकामी वय वर्षे ६० पेक्षा जास्त असलेल्या निराधार ज्येष्ठ नागरीकांना व अनाथ मुलांना उत्पन्न दाखल्याची अट वगळ्यात येणेबाबत मा.अविनश बागवे व मा.अरविंद शिंदे,गटनेते,राष्ट्रीय कॉंग्रेस यांचे दि.२२.१.२०१८ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.१८६,दि.२४.१.२०१८ ला अनुसरुन मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आरोग्य/३५८,दि.३.८.२०१८ चे पत्रान्वये पाठविलेला अभिप्राय विचारासाठी .

**नगरसचिव**

**पुणे महानगरपालिका**